N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** गोकुळ-शिरगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0041 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/02/2025 17:23

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 24/08/2024

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 30/08/2024

**Time From (वेळेपासून):** 11:35 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 22:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 10/02/2025 **Time (वेळ):** 16:11 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 023

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/02/2025 16:11 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सांगवडे ताकरवीर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** निलेश बाळासो तिरपणकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रासांगवडे ता करवीर जिकोल्ह,गोकुळ-शिरगांव,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रासांगवडे ता करवीर जिकोल्ह,गोकुळ-शिरगांव,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7350792626

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.अविनाश मधुकर कोंडीग्रेकर | | | 1. फ्लट नं201 राजगौरव अपार्टमेंट,कोंडीग्रे ताशिरोळ जिकोल्हापू,गोकुळ-शिरगांव, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सर्जेराव बंडा कुंभार | | | 1. कुंभार गल्ली,सांगवडे ताकरवीर, गोकुळ-शिरगांव,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 10/02/2025

मी निलेश बाळासो तिरपणकर, वय-32 वर्षे, व्यवसायः- नोकरी, रा.सांगवडे ता. करवीर. जि.कोल्हापूर मो.नं. 7350792626 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 27/11/2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे श्री. बापू साळुंखे पोलीस निरीक्षक अति.कार्यभार पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.कोल्हापूर यांना माझे वरील मोबाईलवरून फोन करून माझेकडे होणा-या लाच मागणीची तक्रार सांगितली की,,मी वरील पत्त्यावर राहणेस असून माझे आजोबा आप्पासो दत्तू तिरपणकर व माझे वडील बाळासो आप्पासो तिरपणकर हे मयत असून माझे आजोबांचे नांवे सांगवडे गांवी गट क्र. 76 ,77 ची जमीन आहे. माझे आजोबांना व वडीलांना मी सरळ वारस आहे. त्यामुळे आजोबांचे नांवे असलेल्या जमीनीस वारस म्हणून सातबारा पत्रकी माझे नांव लावण्याकरिता दिनांक 6/6/2024 रोजी तलाठी कार्यलय सांगवडे येथे अर्ज दिलेला आहे. परंतू दोन महिने झाले तरी आजोबांचे नांवे असलेल्या जमीनीस माझे नांव वारस म्हणून लागले नसल्याने त्याची चौकशी करण्याकरिता मी दिनांक 23/08/2024 रोजी तलाठी कार्यलय सांगवडे येथे गेलो. त्यावेळी तलाठी श्री. कोंडीग्रे यांना माझे कामाबद्दल चौकशी केली असता तलाठी कोंडीग्रे यांनी कोतवाल सर्जेराव यास भेटणेस सांगितले. म्हणून मी कोतवाल सर्जेराव यांना भेटले त्यावेळी कोतवाल सर्जेराव यांनी आजोबांच्या जमीनीस वारस म्हणून माझे नांव नोंदणी करण्याकरिता आपले स्वतःसाठी व तलाठी कोंडीग्रे यांचेसाठी असे दोघांचे मिळून 5000/-रुपये द्यावे लागतील तेंव्हाच वारस म्हणून नांव नोंदणी होईल असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना काही तरी कमी करा अशी विनंती केली. त्यावेळी कोतवाल सर्जेराव यांनी दोघांचे मिळून 3000/-रुपयांची मागणी करुन आज दिनांक 26/08/2024 र®जी मला पैसे घेवुन बोलवले आहे. कोतवाल सर्जेराव व तलाठी कोंडीग्रे हे माझेकडे मागत असलेले पैसे हे लाच म्हणून असल्याची माझी खात्री झाली आहे. मला त्यांना पैसे देण्याचे नाहीत. तरी कोतवाल सर्जेराव व तलाठी कोंडीग्रे याचेवर आपलेकडून कारवाई होणेस विनंती आहे अशी तक्रार सांगितली त्यावेळी श्री.साळूखे साहेब यांनी त्यांचेकडील नेमणुकीच्या पोनि आसमा मुल्ला मॅडम या तुम्हाला फोन करुन तुमच्या तक्रारीचे अनुषंगाने पुढील कारवाई करतील असे कळविले.

त्याप्रमाणे श्रीमती आसमा मुल्ला यांनी दि 26/8/2024 रोजी माझ्या मोबाईलवर संपर्क करून आपण स्वतः, पंच व स्टाफसह पुढील कारवाई करण्याकरीता येत असल्याचे मला सांगुन मला तक्रारी अर्ज घेवुन कोल्हापुर ते हुपरी रोडवरील सांगवडे गावचे फाटयाजवळ येण्यास सांगीतले.सदर ठिकाणी आल्यानंतर मी मुल्ला मॅडम यांना वसगडे गावचे हद्◌दीतील शरद कोळी यांचे शेताताजवळील खुल्या जागेत गाडी घेणेस सांगितली. त्यावेळी तेथे मुल्ला मॅडम यांनी मला दोन्ही शासकीय पंच, स्टाफ यांची ओळख करून दिली.पोनि मुल्ला मॅंडम यांचे सुचनेवरून पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना माझी वरीलप्रमाणे तक्रार सांगीतली.व माझा लेखी तक्रारी अर्ज त्यांचेकडे दिला.

त्यानंतर मुल्ला मॅडम यांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगीतले.त्यावेळी मुल्ला मॅंडम यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याची संपुर्ण माहिती मला तसेच पंचाना देवुन तलाठी कार्यालय,सांगवडे येथील तलाठी कोंडीग्रे व कोतवाल सर्जेराव यांचे लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने आवश्यक सुचना देवुन मुल्ला मॅडम यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर चालु करून तरी माझ्या गळयात अडकवुन मला व पंच नं.1 श्री.तानाजी कोगेकर यांना माझेकडील मोटर सायकल एमएच-09 डीएल-5469 वरुन तलाठी कार्यालय, सांगवडे येथे पाठवुन दिले.त्यावेळी मी व पंच क्र.1 कोगेकर असे तलाठी कार्यालयामध्ये गेलो.तेथे कोतवाल सर्जेराव

यांना भेटलो त्यावेळी आमचेत माझे सातबारा व वारस नोंदणीचे कामाबाबत चर्चा झाली त्यावेळी मी त्यांना '' पहिल्याच पाच वेगळ आणि यांच तीन वेगळ'' असे विचारले असता, कोतवाल सजेराव यांनी ''तुला काय द्यायच ते दे'' त्यावेळी मी ''काय द्यायच म्हणजे एक रुपये दे'' असे म्हणाले.त्यानंतर सर्जेराव कोतवाल याने मला ''दे '' असे सांगीतले.त्यानंतर सर्जेराव कोतवाल याने मला ''ते दोन ते दोन चार दे '' असे म्हटले असता मी त्यांना ''चार हजार'' असे विचारले तेंव्हा त्याने मला ''हु हु ''असे म्हणुन संमती दर्शविली. त्यानंतर मी सर्जेराव कोतवाल याला '' आपल हाय म्हणुन द्यायच नाय तुम्ही फिक्स काय ते सांगा जोडणा करतो मी कुणाकडण पण घतो,घरात आहेत थोड घेतो आणि आणुन देतो.'' असे सांगीतले.त्यानंतर सर्जेराव कोतवाल यांनी मला ''सांगीतलत तुला, तीन हजार आणुन दे'' असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना ''तीन हजार, बरोबर तुमच आणि त्यांच दोघाच पण''असे विचारले असता सर्जेराव कोतवाल यांनी मला ''हा ''असे सांगीतले. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन मुल्ला मॅडम थांबलेल्या ठिकाणी येवुन मॅडमना सर्व हकीकत सांगितली.

त्यानंतर व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन खात्री केली त्यावेळी कोतवाल सर्जेराव यांनी त्यांचे स्वतःकरीता व तलाठी कोंडीग्रे यांचेकरीता अशी 3000/-रू मागणी केल्याचे निष्पन्न झाले.परंतु तलाठी कोंडीग्रे हे कार्यालयात हजर नसल्याने ते उद्दईक रोजी भेटणार असल्याने मुल्ला मॅडम यांनी चालु कारवाई तात्पुरती स्थगीती करून पुढील कारवाई तलाठी कोंडीग्रे हे तलाठी कार्यालयामध्ये आल्यानंतर करण्याचे ठरविले.

दिनांक 27/08/2024 दिनांक 28/08/2024 दिनांक 29/08/2024 रोजी मी मुल्ला मॅडम यांना तलाठी कोंडीग्रे हे कार्यालयात येणार नसलेबाबत कळवले त्यावेळी त्यांनी मला तलाठी कोंडीग्रे यांची पडताळणी दिनांक 30/08/2024 रोजी करण्याचे सांगितले.

दिनांक 30/08/2024 मुल्ला मॅडम,पंच व स्टाफसह सांगवडे फाटा येथे आले. त्यावेळी मुल्ला मॅडम यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्या गळयात अडकवुन मला व पंच नं.1 श्री.तानाजी कोगेकर यांना माझेकडील मोटर सायकल एमएच-09 डीएल-5469 वरुन तलाठी कार्यालय,सांगवडे येथे पाठवुन दिले.मी पंच क्र. 1 तानाजी कोगेकर यांचेसह तलाठी कार्यालय,सांगवडे येथे गेलो असता माझी तलाठी कार्यालयामध्ये कोतवाल सर्जेराव कुंभार व तलाठी कोंडीग्रे यांची भेट झाली. त्यावेळी कोतवाल सर्जेराव कुंभार व तलाठी कोंडीग्रे यांच्याशी माझी कामाबाबत चर्चा झाली त्यावेळी सर्जेराव यांनी '''दुरुस्त झाल्यावर काय कधी आणुन देतोस'' असे सांगुन हाताने पैशाचा इशारा केला त्यावळी मी ''आत्ता देतो आणुन साहेबांचे आणि तुमच'' असे म्हणालो त्यावेळी सर्जेराव यांने ''साहेबांच तु दे '' असे म्हणाले त्यावेळी मी कोंडीग्रे साहेबांना म्हणालो''साहेब तुमच सांगितलय सर्जु तात्या बोलल्यात परवा दिवशी'' त्यावर तलाठी कोंडीग्रे हे ''हुं हा...'' असे म्हणाले. त्यानंतर आमच्यात इतर चर्चा झाली त्यावेळी मी तलाठी कोंडीग्रे साहेबांना म्हणालो ''मग साहेबांच नव्ह सर्जु तात्यांनी सांगितल्यात तीन हजार दयायला, पाच हजार म्हटल्यालंत तीन हजार कमी करतो म्हटंलंत'' त्यावेळेस तलाठी कोंडीग्रे यांनी मान होकारार्थी हालवून बोटाने कोतवाल सर्जेराव यांचेकडे इशारा केला. त्यानंतर मी सर्जेराव यांना ''ते आणुन कवा देवु, आणुन देवु का'' असे विचारले असता सर्जेराव यांनी ''आत्ता आणुन दयायचं, घेवुन ये जा की'' त्यावेळी मी कोंडीग्रे साहेबांना '' साहेब देवु नव्ह'' असे विचारले असता कोंडीग्रे साहेब यांनी होकारार्थी मान हालवली व बोटाने कोतवाल सर्जेराव यांचेकडे इशारा केला तेंव्हा सर्जेराव मला म्हणला ''साहेबांना काय विचारतोस साहेब सांगायल्यात मला'' असे म्हणाला. त्यानंतर मी व पंच क्र.1 तानाजी कोगेकर असे दोघे मुल्ला मॅडम यांचेकडे परत आलो. त्यानंतर मुल्ला मॅडम यांनी आमचे संभाषण ऐकले. त्यानंतर मुल्ला मॅडम यांचे सुचनेवरून मी तलाठी कोंडीग्रे यांना फोन केला असता तलाठी कोंडीग्रे यांनी मला उदया कार्यालयात येवुन भेटा असे सांगितले. त्यानंतर थोडया वेळाने मी माहिती घेतली असता तलाठी कोंडीग्रे हे कार्यालयात असल्याचे मला समजलेने मी त्याबाबत मुल्ला मॅडम यांना सांगीतले असता त्यांनी मला व पंच कोगेकर यांना तलाठी कोंडीग्रे यांची भेट घेण्यासाठी तलाठी कार्यालयात पाठवले आम्ही तिथे गेलो असता कार्यालय बंद होते. त्यामुळे त्या दिवशीची कारवाई स्थगित करण्यात आली. त्यानंतर वेळोवेळी मी तलाठी कोंडीग्रे हे तलाठी कार्यालयात आले आहेत का याची माहिती घेतली असता ते कार्यालयात आले नसल्याने व मी स्वतः कामासाठी बाहेरगावी गेलो असल्याने मी मुल्ला मॅडम यांना कारवाई मी बाहेर जावून आलेनंतर करूया असे कळवले होते.

दिनांक 23/09/2024 रोजी मी मुल्ला मॅडम यांना फोनव्दारे कळवले की, तलाठी कोंडीग्रे हे कार्यालयामध्ये येणार आहेत असे सांगितले. त्याप्रमाणे आपण तलाठी कोंडीग्रे यांची पुन्हा पडताळणी करण्याचे सांगितले. त्याप्रमाणो मी तलाठी कोंडीग्रे यांना भेटण्यास गेलो असता मला कार्यालयातील कोतवाल सर्जेराव कुंभार यांच्याकडुन समजले की, तलाठी श्री कोंडीग्रे यांची बदली झाली आहे. तसेच त्यांच्या ठिकाणी नवीन तलाठी आले आहेत.त्यावेळी मी त्यांना माझ्या कामाबावत विचारणा केली असता त्यांनी मला ''तुमचे काम हे सर्कल यांच्याकडे पेडिंग असल्याचे सांगितले.'' तसेच मी कोतवाल सर्जेराव कुंभार यांना कोंडीग्रे साहेबांचे पैशाबाबत विचारले असता त्यांनी ''साहेब गेले

की बदलुन तेंन्ही राहिल्यात व्हय,'' त्यांवर मी ''गेले व्हय मग त्यांच किती रूपये हेज नव्हे अर्जाच'' त्यांवेळी कोतवाल सर्जेराव कुंभार यांनी ''काय नाय'' असे म्हणाले. त्यानंतर मी परत जावुन घडलेली हकिकत मुल्ला मॅडम यांना सांगीतली. त्यावेळी मी मुल्ला मॅडम यांना कोतवाल कुंभार यांची पुन्हा एकदा भेट घेवून बोलतो असे सांगितलेनंतर मला व पंच कोगेकर यांना मुल्ला मॅडम यांनी कोतवाल सर्जेराव यांची भेट घेण्याकरिता पंचासह पाठवले त्यावेळी मी ते एकटे भेटतील म्हणुन कार्यालयाच्या बाहेर जावुन थांबलो. कोतवाल सर्जेराव कुंभार हे कार्यालयात होते.म्हणुन मी त्यांची बाहेर येण्याची वाट पाहत बसलो. दरम्यान मुदतीत मी त्यांना माझे मोबाईल वरून फोन केला असता त्यांनी माझा फोन उचलला नाही. त्यांनतर कोतवाल सर्जेराव कुंभार व नवीन आलेले तलाठी हे गाडीवरून निघुन गेले.त्यामुळे माझे त्यांच्याशी बोलणे झाले नाही.त्यानंतर सदरची हकीकत मी मुल्ला मॅडम यांना सांगीतली. त्यानंतर त्या दिवशीची कारवाई स्थगित करण्यात आली.

दिनांक 24/09/2024 रोजी मला मुल्ला मॅडम यांचा फोन आला होता परंतु कोतवाल सर्जेराव कुंभार हे कार्यालयात हजर नसल्याचे मी त्यांना सांगीतले. दरम्यान कालावधीत मुल्ला मॅडम वेळोवेळी माझ्याशी संपर्क करून कारवाई बाबत विचारणा करत होत्या.परंतु मी कामानिमित्त बाहेरगावी असल्याचे मुल्ला मॅडम यांना कळविले होते. मी गावी आल्यानंतर कोतवाल सर्जेराव कुंभार यांच्याबाबत माहिती घेतली असता ते आजारी असल्याने कार्यालयात येत नसल्याचे मला समजलेने मी त्याबाबत मुल्ला मॅडम यांना कळविले. तसेच मी बाहेरगावी असताना माझे वारसांची नोंद घालुन कोणाचे तरी मार्फतीने तलाठी कार्यालयातुन उतारा माझे पत्नीकडे घरी आणुन दिला. त्याबाबत माझे पत्नीने मला फोनवरून सांगितले. त्यावेळी मला मुल्ला मॅडम यांनी कारवाईचे अनुषंगाने येणेस कळविले असता त्यांना मी मोठया कामासाठी बाहेरगावी असुन मी दोन महिने गावी येणार नाही मी गावी आल्यानंतर पुढील कारवाई करू असे सांगितले.

त्यांनतर मी माझे कामावरून परत घरी आलो त्यावेळी मला समजले की कोतवाल सर्जेराव कुंभार यांचे डोळ्याचे ऑपरेशन झाले असुन ते दवाखान्यात अॅडमीट असल्याचे समजले. परंतु कोतवाल सर्जेराव कुंभार यांनी उतारा आणुन दिल्या नंतर राहिलेल्या पैशाकरिता मला निरोप दिला होता. तो माझेकडुन पैसे स्विकारेल पण थोडे दिवस थांबायला पाहिजे असे मी मुल्ला मॅडम यांना कळविले होते. त्याप्रमाणे मुल्ला मॅडम यांनी वेळ®वेळी मला संपर्क साधुन पुढील कार्यवाही करणेची असलेबाबत कळविले होते परंतु मी पुन्हा कामानिमित्त बाहेरगावी असल्याने मी गावी आल्यानंतर कार्यालयात येवुन भेटणार असलेबाबत मुल्ला मॅडम यांना कळविले होते .

त्यानंतर दि. 22/01/2025 रोजी मी गावी असताना मुल्ला मॅडम यांनी मला संपर्क केला असता मी त्यांना तलाठी कोंडीग्रे यांची बदली झाली असल्याने, तसेच कोतवाल सर्जेराव यांनी माझा उतारा मला दिला असल्याने, कोतवाल सर्जेराव व तलाठी कोंडीग्रे यांनी यापुर्वी माझेकडे मागणी केलेल्या लाच रकमेबाबत कोणताही संपर्क केलेला नाही.त्यामुळे ते आता माझ्याकडून पैसे स्विकारण्याची शक्यता नाही याची मला खात्री झाली आहे.तलाठी कोंडीग्रे यांचे नाव अविनाश मधुकर कोंडीग्रेकर रा.प्लॅट नं. 201, राजगौरव अपार्टमेंट, टेंबलाईवाडी, ता.करवीर जि. कोल्हापूर मुळ रा.कोंडीग्रे ता.शिरोळ जि.कोल्हापूर असे असल्याचे व कोतवाल सर्जेराव बंडा कुंभार रा.कुंभार गल्ली, सांगवडे ता.करवीर जि.कोल्हापूर असे असल्याचे समजलेले आहे.

तरी माझे सांगवडे गावी गट क्र. 76 ,77 ची जमीन आहे. माझे आज®बांना व वडीलांना मी सरळ वारस आहे. त्यामुळे आज®बांचे नांवे असलेल्या जमीनीस वारस म्हणून सातबारा पत्रकी माझे नांव लावणेकरिता सांगवडे गावचे कोतवाल सर्जेराव कुंभार यांनी स्वतः करीता व तलाठी अविनाश कोंडीग्रेकर यांचेकरीता अप्रामाणिकपणे व बेकायदेशीरपणे माझेकडे 5000/-रू ची मागणी करून तडजोडीअंती 3000/- रूपये लाचेची मागणी तलाठी अविनाश कोडींग्रेकर यांचेसमक्ष केली तसेच तलाठी कोंडीग्रेकर यांनीही कोतवाल सर्जेराव कुंभार यांनी माझेकडे मागणी केलेल्या लाच रकमेस संमती देवून लाच रक्कम सर्जेराव यांचेकडे देण्यास प्रोस्ताहान दिले आहे म्हणुन माझी सांगवडे येथील तत्कालिन तलाठी श्री.अविनाश कोंडीग्रेकर व कोतवाल सर्जेराव कुंभार यांचेविरुध्द माझी फिर्याद आहे.

माझा वरील जबाब मी वाचुन पाहिला तो माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केला असुन तो मी प्रिंटरवर प्रिंट काढलेनंतर वाचुन पाहिला असता तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा दिला जबाब स.ता.म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

tabassum jamal magdum(I (Inspector)) / or (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलिस ठाणे अंमलदार
गोकुळ शिरगांव M.I.D.C. पो.ठाणे
जि.कोल्हापूर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): tabassum jamal ma

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):